# रामायणातील गोष्टी



BVBK-0400034

# रामायणातील गोष्टी

संध्या मुधोळकर

अनमोल

BV BK-0400034

अनमोल प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :

मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन,
६८३ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.

*

सर्व हक्क प्रकाशकाकडे

*

२६ जानेवारी १९७७
पुनर्मुद्रण १९७८
**पुनर्मुद्रण, मार्च १९८०,**
**पुनर्मुद्रण, जून १९८६**

*
**मुद्रक :**
**चं गो. फडके,**
**किर्लोस्कर प्रेस,**
**वीर सावरकर नगर**
**पुणे ४११०३७**

मुखपृष्ठ सजावट :
रमेश मुधोळकर

*

किंमत रु. २.५०

# वाल्या कोळी

एक होता वाल्या कोळी. तो दाट जंगलात राहायचा. आल्या-गेल्या वाटसरूंना मारायचा. त्यांच्याजवळचे पैसे घ्यायचा. हाच त्याचा धंदा.



एकदा काय झाले, जंगलातील वाटेवरून नारदमुनी चालले होते. वाल्याने त्यांना अडविले. वाल्या म्हणाला, " ए ! चल, तुझ्याजवळ काय

असेल नसेल ते टाक. नाहीतर तुला मारतो."

नारदमुनी म्हणाले, "वाल्या, वाटसरूंना मारणे, त्यांना लुबाडणे हे पाप आहे. हे पाप तू का करतोस ?"

वाल्या म्हणाला, "बायको व मुलांच्या सुखासाठी मी हे करतो."

नारदमुनी म्हणाले. "ठीक आहे. ज्यांच्यासाठी तू हे पाप करतोस ते तुझ्या पापात वाटेकरी व्हायला तयार आहेत का ?"

वाल्या कोळी विचारात पडला. तो घाईघाईने घरी गेला. बायकोला व मुलांना म्हणाला, "वाटसरूंना मारून मी त्यांच्या वस्तू तुम्हाला आणून देत होतो. त्या सर्व तुम्ही घेतल्या. असे केल्यामुळे मला पाप लागले आहे. त्या पापात तुम्हीपण वाटेकरी व्हाल ना ?"

हे ऐकून बायको व मुले म्हणाली, "नाही, नाही; पापबीप नाही आम्ही वाटून घेणार."

हे ऐकून वाल्याला दुःख झाले. त्याने धावत येऊन नारदमुनींचे पाय धरले. नारदमुनींना तो म्हणाला, "माझे पाप नाहीसे होण्याचा उपाय सांगा. बायको व मुले काही ते वाटून घेत नाहीत."

नारदमुनी म्हणाले, "तू रामनामाचा जप कर. त्यामुळे तुझे पाप नाहीसे होईल."

वाल्या मग घरी गेलाच नाही. जंगलात बसून त्याने 'राम राम' असा जप सुरू केला. कित्येक वर्षे त्याने जप केला.

रामनामाच्या जपामुळे पाप नाहीसे होऊन वाल्या कोळ्याचे 'वाल्मीकी ऋषी' झाले. याच वाल्मीकी ऋषींनी रामाची कथा रचली. त्यालाच 'रामायण' असे

म्हणतात. वाल्मीकी ऋषींनी अंतर्ज्ञानाने 'रामायण' रामजन्माच्या आधीच लिहिले.

★

## रामजन्म

शरयू नदीच्या काठी अयोध्या नगर होते. तेथे दशरथ राजा राज्य करीत होता. त्याला तीन राण्या होत्या. कौसल्या, सुमित्रा व कैकेयी.

दशरथ पराक्रमी होता. त्याच्याजवळ खूप संपत्ती होती. लोक सुखी होते. सर्व काही होते. पण दशरथाला मूलबाळ नव्हते. त्यामुळे स्वतः दशरथ राजा व त्याच्या राण्यांना फार दुःख होई.

वसिष्ठऋषींच्या सांगण्यावरून दशरथ राजाने देवांना संतुष्ट करण्यासाठी यज्ञ

केला. यज्ञात आहुती पडू लागल्या. यज्ञातून 'प्रजापत्य' नावाचा तेजस्वी पुरुष बाहेर आला. त्याने दशरथ राजाला 'प्रसाद' दिला. दशरथ राजाने हा प्रसाद कौसल्या, सुमित्रा व कैकेयी यांना दिला.



पुढे योग्य वेळी त्यांना सुंदर व तेजस्वी मुले झाली. चैत्र महिन्यात नवमीला कौसल्या राणीला मुलगा झाला. मुलाचे नाव 'रामचंद्र' ठेवण्यात आले. सुमित्रेला दोन मुलगे झाले. त्यांची नावे 'लक्ष्मण'

व 'शत्रुघ्न.' कैकेयीला एक मुलगा झाला. त्याचे नाव 'भरत' ठेवले.

राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न. दशरथाचे हे चार मुलगे पाहून राजा, राण्या, सर्व प्रजाजन अत्यंत आनंदित झाले.

★

## राम-लक्ष्मणांचे शौर्य

राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांना वसिष्ठ ऋषींनी शिक्षण दिले. त्यांना वेद शिकविले, धनुर्विद्या शिकविली. त्या सर्वांचे एकमेकांवर फार प्रेम होते. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न रामाला देवाप्रमाणे मानीत.

एक दिवस विश्वामित्र ऋषी दशरथ राजाकडे आले. विश्वामित्र म्हणाले, "राजा, मी यज्ञ करीत असता राक्षस

फार त्रास देतात. यज्ञाचे रक्षण करण्यासाठी तू राम व लक्ष्मणाला माझ्याबरोबर पाठव."

दशरथाला काळजी वाटू लागली. राम-लक्ष्मण तर अजून लहानच. ते अरण्यात राहून भयंकर अशा राक्षसांशी युद्ध करणार, हे त्यांना जमेल का? पण वसिष्ठ ऋषींनी दशरथाची समजूत घातली. राम हा भगवान विष्णूंचा अंश असल्यामुळे त्रिभुवनात रामाला कसलीही भीती नाही असे वसिष्ठ ऋषींनी दशरथ राजाला सांगितले.

दशरथाने राम व लक्ष्मणाला विश्वामित्र ऋषींबरोबर पाठविले. शरयू नदीच्या काठाने जात असता वाटेत मोठे जंगल लागले. तेथे वाघ, सिंहासारखी जनावरे होती. तेथे त्राटिका नावाची भयंकर राक्षसी राहात असे. ती जोरजोराने धूळ

व 'शत्रुघ्न.' कैकेयीला एक मुलगा झाला. त्याचे नाव 'भरत' ठेवले.

राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न. दशरथाचे हे चार मुलगे पाहून राजा, राण्या, सर्व प्रजाजन अत्यंत आनंदित झाले.

★

## राम-लक्ष्मणांचे शौर्य

राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांना वसिष्ठ ऋषींनी शिक्षण दिले. त्यांना वेद शिकविले, धनुर्विद्या शिकविली. त्या सर्वांचे एकमेकांवर फार प्रेम होते. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न रामाला देवा-प्रमाणे मानीत.

एक दिवस विश्वामित्र ऋषी दशरथ राजाकडे आले. विश्वामित्र म्हणाले, "राजा, मी यज्ञ करीत असता राक्षस

फार त्रास देतात. यज्ञाचे रक्षण करण्यासाठी तू राम व लक्ष्मणाला माझ्याबरोबर पाठव."

दशरथाला काळजी वाटू लागली. राम-लक्ष्मण तर अजून लहानच. ते अरण्यात राहून भयंकर अशा राक्षसांशी युद्ध करणार, हे त्यांना जमेल का? पण वसिष्ठ ऋषींनी दशरथाची समजूत घातली. राम हा भगवान विष्णूंचा अंश असल्यामुळे त्रिभुवनात रामाला कसलीही भीती नाही असे वसिष्ठ ऋषींनी दशरथ राजाला सांगितले.

दशरथाने राम व लक्ष्मणाला विश्वामित्र ऋषींबरोबर पाठविले. शरयू नदीच्या काठाने जात असता वाटेत मोठे जंगल लागले. तेथे वाघ, सिंहासारखी जनावरे होती. तेथे त्राटिका नावाची भयंकर राक्षसी राहात असे. ती जोरजोराने धूळ

उडवीत, चिडून भयंकर गर्जना करीत येत होती. विश्वामित्र ऋषींच्या आज्ञे-



वरून रामाने एकाच बाणाने त्राटिकेचा वध केला. त्यामुळे विश्वामित्र प्रसन्न झाले.

राम-लक्ष्मण विश्वामित्र ऋषींच्या आश्रमाजवळ आले. विश्वामित्र ऋषींनी यज्ञ सुरू केला. कित्येक राक्षसांनी त्यांना त्रास द्यायला सुरुवात केली. सुबाहू-सारख्या बलाढ्य राक्षसाला व इतरही अनेक राक्षसांना रामाने ठार केले. ते

पाहून बाकीचे राक्षस घाबरून पळून गेले. यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला.

★

## सीता-स्वयंवर

मिथिलेचा राजा जनक याला जमीन नांगरीत असता एक गोजिरवाणी सुंदर मुलगी सापडली. तिचे नाव त्याने 'सीता' असे ठेवले.

सीता जसजशी मोठी होऊ लागली तसतशी ती अधिकच सुंदर दिसू लागली. जनक राजाकडे शंकराचे एक धनुष्य होते. ते अतिशय जड होते; पण सीता मात्र ते धनुष्य उचलून लहानपणी त्याच्याशी खेळत असे. इतके जड धनुष्य सीतेने उचललेले पाहून जनक राजाला तिचे फार कौतुक वाटे.

जनक राजाने सीतेचे स्वयंवर करण्याचे ठरविले. 'हे शंकराचे धनुष्य उचलून त्याला जो दोरी लावील त्याच्याशी सीता लग्न करील', असा पण जनक राजाने लावला. सीतेच्या स्वयंवराची बातमी विश्वामित्र ऋषींना समजली. ते राम व लक्ष्मणाला घेऊन स्वयंवराच्या ठिकाणी आले. स्वयंवराकरिता देशोदेशींचे राजे आले होते. शंकराचे ते प्रचंड धनुष्य पाहून ते उचलायला पुढे जावे का नाही असा त्यांपैकी अनेकांना प्रश्न पडला.

इतक्यात लंकेचा राजा रावण दिमाखात पुढे आला. त्याने धनुष्य उचलले पण ते इतके जड होते की रावण पडला उताणा. त्याच्या छातीवर धनुष्यही पडले. अशी फजिती झाली रावणाची.

विश्वामित्र ऋषींनी रामाला आज्ञा केली. रामाने त्यांना नमस्कार केला व

पुढे होऊन धनुष्य सहज उचलले. आता राम धनुष्याला दोरी लावणार इतक्यात



काड् कडाड् आवाज होऊन धनुष्य मोडले. रामाने पण जिंकला. सीतेने रामाच्या गळ्यात माळ घातली.

राम-सीतेचे लग्न झाले. सर्वांना आनंद झाला. लंकेचा राजा रावण याला मात्र आनंद झाला नाही.

★

# रामाचा वनवास

राम आता मोठा झाला होता. दशरथ राजा म्हातारा झाला होता. त्याने रामाला राज्यावर बसविण्याचे ठरविले.

राम सगळ्यांनाच आवडत असे. आता राम राजा होणार म्हणून सर्व आनंदात होते. वसिष्ठ ऋषींनी रामाला राज्याभिषेक करण्याकरिता मुहूर्त शोधून काढला. समारंभाची तयारी सुरू झाली.



इकडे कैकेयी राणी मात्र रुसून बसली. दशरथ राजा तिच्या भेटीला गेला. तिला म्हणाला, "काय हवे ते माग पण अशी रुसू नकोस."

कैकेयी म्हणाली, "मागे आपण मला दोन वर दिले होते. ते मी आता मागते. एका वराने माझा मुलगा भरत याला राज्य मिळावे. दुसऱ्या वराने रामाला चौदा वर्षे वनवासास पाठवावे."

राजाने तिची खूप समजूत घातली. पण कैकेयी काही ऐकेना.

इकडे रामाला ही गोष्ट समजली. दशरथ राजाचे रामावर फार प्रेम होते. दुःखामुळे त्याला एकही शब्द बोलवेना. रामाने सर्वांची समजूत घातली. राम वनात जाण्यास निघाला.

रामाबरोबर लक्ष्मणही निघाला. सीतेला हे कळले. तीपण रामाबरोबर

वनात जाण्यास निघाली. हे पाहून सर्वांना फार फार दुःख झाले.

कौसल्यामातेचा व इतर सर्वांचा निरोप घेऊन राम, लक्ष्मण व सीता वनवासाला निघाले.

रामाच्या आठवणींनी तळमळून दुःखाने दशरथ राजाला मृत्यू आला.

यावेळी भरत आजोळी होता. त्याला ही गोष्ट समजली. त्याला कैकेयीचे वागणे मुळीच आवडले नाही. कारण त्याचेही रामावर फार प्रेम होते. राज्याचा लोभ भरताला मुळीसुद्धा नव्हता. आता राम तर वनवासाला गेलेला. रामाला परत आणण्यासाठी भरत वनात गेला. पण राम परत आला नाही. म्हणून भरताने रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून रामाच्या नावाने राज्य केले.

★

# रावणाने सीतेला पळविले

वनवासात राम-लक्ष्मण, सीता हे चित्रकूट पर्वतावर काही काळ राहिले. नंतर ते दण्डकारण्यात राहिले. त्यानंतर अगस्ति ऋषींच्या सांगण्यावरून पंचवटी येथे एक पर्णकुटी बांधून ते राहू लागले.

तेथे राहात असता रावणाची बहीण शूर्पणखा ही लक्ष्मणाला त्रास देऊ लागली. म्हणून लक्ष्मणाने तिचे नाक व कान कापले. शूर्पणखा राक्षसिणीने चिडून आरडा-ओरडा करीत रावणाकडे धाव घेतली.

सीतेचे रामाशी लग्न झाले तेव्हापासून रावण चिडलेलाच होता. तो आता अधिकच चिडला. त्याने मारीच राक्षसाला बरोबर घेऊन सीतेला पळवावयाचा बेत ठरविला.

मारीच राक्षसाने सोनेरी हरिणाचे रूप घेतले. हे सुंदर हरिण सीतेच्या दृष्टीस पडले. तिला हरिण फार आवडले. ती रामाला म्हणाली, "मला हे हरिण हवे आहे. लवकर जाऊन हरिणाला पकडून आणा."



सीतेच्या हट्टामुळे राम धनुष्यबाण घेऊन हरिणाच्या मागे धावला. हरिण पळत पळत खूप लांब गेले. हरिणाला पकडता येईना म्हणून रामाने हरिणाच्या दिशेने बाण सोडला. हरिणाला बाण लागताच 'लक्ष्मणा धाव' असे हरिण मनुष्यवाणीने ओरडले.

हा आवाज ऐकून सीता घाबरली. राम संकटात आहे असे वाटून सीतेने लक्ष्मणाला मदतीसाठी पाठविले.

नाइलाजाने लक्ष्मण निघाला. पण निघता निघता पर्णकुटीच्या बाहेर एक रेघ मारून सीतेला म्हणाला, "ही रेघ ओलांडून बाहेर जाऊ नका हं, वहिनी."

लक्ष्मण दिसेनासा झाल्यावर बैराग्याचे रूप घेतलेला रावण पर्णकुटीजवळ आला. 'माई, भिक्षा वाढा' असे म्हणून लांब उभा राहिला.

सीतेने पाहिले. ती भिक्षा घेऊन आली. भिक्षा वाढताना तिचा पाय लक्ष्मणाने मारलेल्या रेघेबाहेर पडला. तेव्हा रावणाने तिला खांद्यावर टाकून, आकाशमार्गे तो लंकेच्या दिशेने निघाला.

राम व लक्ष्मण परत आले. त्यांना पर्णकुटीत सीता दिसली नाही. तेव्हा ते

दुःखी अंतःकरणाने सीतेच्या शोधाला निघाले.

★

## सीतेचा शोध

राम-लक्ष्मण सीतेला शोधत असता त्यांना जटायू नावाचा गिधाडांचा राजा भेटला. जटायूचे पंख व पाय रावणाने कापले होते. कारण रावण सीतेला पळवून नेत असता जटायूने सोडविण्याचा प्रयत्न केला होता. जटायूने रामाला सांगितले की रावणाने सीतेला पळवून नेले आहे.

असेच शोध घेत घेत पुढे जात असता राम व लक्ष्मणाला पंपा नावाचे एक सुंदर सरोवर लागले. जवळच किष्किंधा नगरीचा वानरांचा राजा सुग्रीव राहात असे. त्याचे राज्य परत मिळविण्यासाठी रामाने त्याला मदत केली. त्यानेही रामाला सीतेचा शोध

घेण्याच्या कामी मदत करण्याचे ठरविले.

सुग्रीवाकडे मारुती नावाचा महापराक्रमी वानर सेनापती होता. हा मारुती क्षणार्धात खूप लांब पोचू शकत असे. म्हणून रामाने लंकेला जाऊन सीतेचा शोध करून येण्यास मारुतीला पाठविले.

साहसाची आवड असलेला मारुती आकाशमार्गे क्षणार्धात लंकेला पोचला.

रावणाने सीतेला अशोकवनात ठेवले होते. तिच्याभोवती कुरूप, अक्राळविक्राळ राक्षसिणींचा पहारा होता. मारुतीने सीतेला पाहिले. संधी साधून त्याने रामाची अंगठी सीतेला दिली.

अंगठी पाहून सीतेला आनंद झाला. ती मारुतीला म्हणाली, "रामाला सांग, मला येथून लवकर सोडवावे.

सीतेचा निरोप घेऊन मारुती निघाला. त्याने अशोकवनातील कित्येक झाडे

मोडली. तेथील जंबू नावाचा रखवालदार मारुतीला पकडण्यासाठी धावला. मारुतीने त्याला मारले.

हे समजताच रावणाचे सेवक मारुतीला पकडण्यास धावले. त्यांना मारुतीने खूप त्रास दिला. शेवटी मारुती आपणहून रावणासमोर आला.

रावणाने मारुतीच्या शेपटीला चिंध्या बांधून तीवर तेल ओतण्याची आज्ञा दिली. इतके झाल्यावर रावण स्वतः शेपूट पेटवू लागला. शेपूट पेटले, आगीचा भडका झाला. त्यामुळे रावणाचे तोंड भाजले.



मारुती उडाला. या घरावरून त्या घरावर उड्या मारीत सुटला. सारी घरे पेटली. राक्षस सैरावैरा पळत सुटले. लंका जळाली. मग मारुतीने समुद्रात शेपूट विझविले.

सीतेचा शोध घेऊन मारुती रामाकडे परत आला.

★

## राम-रावण युद्ध

मारुती परत आल्यानंतर रामाने सीतेची सुटका करायचे ठरविले. त्याकरिता लंकेला जाऊन रावणाबरोबर युद्ध करायचे ठरले. सुग्रीवाने आपली वानरसेना रामाच्या मदतीला दिली. सर्वजण दक्षिणेकडे लंकेच्या दिशेने निघाले.

लंका हे बेट आहे. लंका म्हणजेच

हल्लीचे सिलोन. त्याच्या चारी बाजूंनी समुद्र आहे. समुद्रातून पलीकडे कसे जायचे? त्याकरिता वानरांनी दगड उचलून समुद्रात टाकायला सुरुवात केली. पण दगड समुद्रात टाकले की तळाशी जात. आता काय करावे?

मग मारुतीने एक भला मोठा दगड उचलला व रामाचे नाव घेऊन समुद्रात टाकला. काय आश्चर्य! हा दगड मात्र तळाशी गेला नाही, तर पाण्यावरच तरंगू लागला. इतर वानरांनी पण 'राम, राम' असे म्हणून भराभर दगड टाकले समुद्रात. सारे दगड तरंगू लागले. दगडांचा सेतू तयार झाला. त्यावरून सर्वजण लंकेला पोचले.

अंगद रामाचा दूत झाला. तो रावणाच्या राजवाड्यात गेला. रावणाला म्हणाला, "सीतेला सोडून दे."

रावणाने ऐकले नाही. मग युद्ध सुरू झाले. रावणाने कपटाने सीतेला पळवून आणले होते. हे रावणाचा भाऊ बिभीषण याला पटत नव्हते. म्हणून तो रावणाच्या बाजूने युद्ध करायला तयार झाला नाही.

रामाची वानरसेना व रावणाचे राक्षस सैन्य यांचे घनघोर युद्ध सुरू झाले.

रावणाचा मुलगा इंद्रजित याने मारलेल्या बाणांनी अनेक वानर मेले. सुग्रीव, मारुती, अंगद वगैरे बलवान वानरांनी अनेक राक्षस मारले.

कुंभकर्ण नावाचा रावणाचा एक भाऊ होता. तो इतका डाराडूर झोपत असे की एकदा झोपला की सहा सहा महिने उठत नसे. त्याच्या कानांजवळ मोठमोठ्याने ढोल-ताशे वाजवून रावणाने त्याला उठविले व युद्धावर पाठविले.

कुंभकर्णाचे शरीर अगडबंब होते.

त्याला पाहून वानरसैन्यात घबराट उडाली. रामाने एकाच बाणाने कुंभकर्णाला ठार केले.

रावण फार संतापला. तो स्वतः लढाईला आला. रावणाला दहा तोंडे होती. बाण लागून त्यातले एखादे तोंड तुटले की त्याजागी पुन्हा नवे तोंड येई.

रावणाच्या एका बाणाने लक्ष्मण बेशुद्ध झाला. राम शोक करू लागला. हे पाहून सुषेण याने मारुतीला द्रोणागिरी पर्वतावरील दिव्य औषधी आणण्यास पाठविले. मारुती पर्वतावर जाऊन औषधी शोधू लागला. पण त्याला ती न सापडल्याने त्याने द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला. त्यावरील दिव्य औषधीने लक्ष्मण शुद्धीवर आला.

युद्ध चालू असता देवांचा राजा इंद्र याने रामाला एक रथ दिला. रथात बसून

रामाने सोडलेला एक तेजस्वी बाण रावणाला लागला. रावण धाड्कन् कोसळला व मृत्यू पावला.



रामाचा जय झाला. देवांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली.

रामाने रावणाचा भाऊ बिभीषण याला लंकेचे राज्य दिले. राम व सीतेची भेट झाली. याच सुमारास वनवासाची चौदा वर्षे पूर्ण झाली. म्हणून राम-लक्ष्मण, सीता व इतर सर्वजण अयोध्येकडे निघाले.

# रामराज्य

राम लक्ष्मण व सीता यांचेसह अयोध्येला जावयास निघाला. वनवासाची चौदा वर्षें संपली होती.

भरत रामाची आतुरतेने वाट पाहात होता.

राम येणार म्हणून अयोध्या नगरी सजली होती. रामाला पाहाताच भरताने धावत जाऊन रामाच्या पायाला मिठी मारली. रामानेही मोठ्या प्रेमाने भरताला छातीशी कवटाळले.

भरताने रामाला सिंहासनावर बसविले.

रामराज्य सुरू झाले. रामराज्यात सर्वजण फार सुखी होते. पाऊस वेळेवर पडत होता. पिके भरपूर येत होती. बागा फळाफुलांनी बहरत होत्या. सर्व लोक सुखासमाधानात होते.

पण काही लोक म्हणू लागले, 'सीता रावणाकडे राहिली होती तेव्हा ती पवित्र कशी राहिली असेल?' ते ऐकून रामाला वाईट वाटले. पण लोकांच्या समाधाना-साठी रामाने सीतेला वनात सोडून दिले. त्यावेळी सीता गरोदर होती.

वाल्मीकी ऋषींनी सीतेला आपल्या आश्रमात नेले. तेथे ती बाळंत होऊन तिला दोन सुंदर पुत्र झाले. वाल्मीकी ऋषींनी एकाचे नाव लव आणि दुसऱ्याचे नाव कुश ठेवले.

लव आणि कुश ह्यांना वाल्मीकी ऋषींनी अनेक विद्या शिकविल्या. सर्व विद्यांमध्ये ती दोघे पारंगत झाली. रामा-सारखीच ती तेजस्वी दिसू लागली.

★

# अश्वमेध

सीतेला वनात सोडून दिल्यापासून राम फार दुःखी होता. शेवटी समाधानासाठी त्याने अश्वमेध यज्ञ करायचे ठरविले. यज्ञासाठी रामाने एक घोडा सोडला. त्याच्या कपाळावर लिहिले होते की, " जो कोणी हा घोडा धरेल त्याला रामाशी लढा द्यावा लागेल. "

तो घोडा वाल्मीकी ऋषींच्या आश्रमापाशी आला. लव आणि कुश यांनी तो पकडून ठेवला. रामाच्या सैन्याशी लढून त्यांनी रामाचा पराभव केला. रामाला त्यांच्या शौर्याचे कौतुक वाटले. त्यावेळी वाल्मीकी ऋषींनी त्याला सांगितले की ही तुझीच मुले आहेत. रामाची सीतेशीही भेट झाली. सीतेने मुलांना रामाच्या



स्वाधीन करून भूमातेची प्रार्थना केली त्याबरोबर चमत्कार झाला. भूमी दुभंगली व भूमातेने सीतेला आपल्या पोटात घेतले.

★

# रामावतार संपला

सीता गेल्यामुळे रामाला अतोनात दुःख झाले. त्याने लव-कुशास आपले राज्य वाटून दिले.

त्यानंतर लक्ष्मणाने शरयू नदीच्या तीरावर दर्भाच्या आसनावर बसून प्राण सोडला.

लक्ष्मण गेल्यानंतर रामाने आपला अवतार संपविण्याचे ठरविले.

आपल्या देवदैवतांचे स्मरण करून रामाने शरयू नदीत जलसमाधी घेतली. रामावतार संपला.

BVBK-0400034

★